1 OCT 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डी. टी. शिर्के : महावीर महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण लवचिक, सर्वसमावेशक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : व्यावसायिक शिक्षणाबरोबरच कौशल्याधारित रोजगाराभिमुख शिक्षणासाठी शिक्षणसंस्थांनी आणि अध्यापनासाठी शिक्षकांनी स्वतःच्या मानसिकतेत बदल घडविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी केले.

महावीर महाविद्यालय आणि ऑल इंडिया कॉलेज प्रिन्सिपल असोसिएशन यांच्या सहकार्याने आयोजित 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : संधी व आव्हाने' या दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ॲडव्होकेट के.ए.कापसे होते. यावेळी माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, सचिव एम.बी.गरगटे उपस्थित होते.



कोल्हापुरात महावीर महाविद्यालयात शनिवारी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण चर्चासत्राचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. यावेळी ॲड. के. ए. कापसे, डॉ. नितीन करमळकर, एम. बी. गरगटे, प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणामुळे तंत्रज्ञानाचा शिक्षणात मोठा वापर होणार आहे. बहुशाखीय दृष्टिकोनाद्वारे प्रोत्साहन मिळून संशोधनामध्ये नवोपक्रमाला चालना मिळेल. शिक्षणामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडेल.

डॉ. करमळकर म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी दृष्टिकोन बदलला पाहिजे. विद्यार्थी अनेकविध शाखांचे अभ्यासक्रम एकाच वेळी पूर्ण करू शकतो, या धोरणाद्वारे विद्यार्थ्याला पुस्तकी ज्ञानाऐवजी व्यावहारिक ज्ञान मिळेल. अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया अधिक आनंददायी, सर्जनशील बनेल.

डॉ.आर.पी.लोखंडे यांनी प्रास्तविक केले. डॉ. अजितकुमार चौगले यांनी परिचय करून दिला. डॉ. कल्पना गंगातीरकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संजय ओमासे यांनी आभार मानले. चर्चासत्रात देशभरातील नोडल ऑफीसर, प्राध्यापक सहभागी होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात क्रीडा कार्यशाळेला प्रतिसाद

## तंत्रशुद्ध प्रशिक्षण केंद्र उपलब्ध करू : शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिभागामार्फत तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षण आणि एआययू खेळाडू पात्रता नियमावली या विषयावर शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील क्रीडा शारीरिक संचालक यांच्यासाठी घेण्यात आलेल्या एकदिवसीय कार्यशाळेला प्रतिसाद मिळाला.

या कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. येणाऱ्या काळात खेळाडूंना सर्व सुविधानियुक्त तंत्रशुद्ध प्रशिक्षण केंद्र उपलब्ध करून देण्याची सोय येथे करण्यात येणार आहे असे सांगून त्यांनी विद्यापीठाच्या खेळाडूंना व सर्व शारीरिक शिक्षण संचालकांचे गतवर्षी प्रावीण्य प्राप्त केल्याबद्दल अभिनंदन



केले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात महेंद्र गोखले यांनी विविध क्रीडा प्रशिक्षणामध्ये वयोगटानुसार कसे क्रीडा प्रशिक्षण द्यायला हवे आणि प्रशिक्षकाने खेळाडूची मानसिकता, शारीरिक तंदुरुस्ती आणि आहार या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात अमरावती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी असोसिएशन ऑफ इंडिय युनिव्हर्टिज द्वारा दिलेल्या स्पर्धेसाठी पात्रता यावर मार्गदर्शन केले. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्तविक केले.

लोकमत

# नारायण कुलकर्णींना काळसेकर पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा २०२३ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांना, तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' वर्जेश सोळंकी यांना बुधवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आहेत.

नियतकालिकांच्या संपादन व लघुनियतकालिक चळवळीत सक्रिय सहभाग असणाऱ्या सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो. २१,००० रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सतीश काळसेकर काव्य पुरस्काराचे मानकरी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांनी ६१ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, युगवाणी नियतकालिकाचे संपादक म्हणून काम केले आहे. नवदोत्तर कालखंडात बदलत्या समाजजीवनाचा मागोवा घेणाऱ्या त्यांच्या कवितेने मराठी कवितेत स्वतंत्र ठसा उमटवला आहे. वर्जेश सोळंकी यांनी मानवी वृत्तींचा शोध घेणारी वैशिष्ट्यपूर्ण कविता समकालीन मराठी कवितेला दिली. असे मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठात ४ ऑक्टोबरला काळसेकर काव्य पुरस्कार प्रदान समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा २०२३ चा काळसेकर काव्य पुरस्कार प्रदान समारंभ बुधवार (दि. ४) रोजी सकाळी ११.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृह येथे ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान केला जाणार आहे. यावेळी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. आदित्य काळसेकर, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे हे प्रमुख उपस्थित राहणार असल्याची माहिती मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली.

विद्यापीठाच्या वतीने 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांना, तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' वर्जेश सोळंकी यांना जाहीर करण्यात आला आहे. नियतकालिकांच्या संपादन व लघुनियतकालिक चळवळीत सक्रिय सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो. २१ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यांच्या कुटुंबीयांतर्फे सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रुपये सात लाख विद्यापीठाकडे देणगी स्वरूपात सुपूर्द केले. या रकमेतून काव्य क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो.

पुण्यनगरी

# काळसेकर काव्य पुरस्काराचे ४ रोजी वितरण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांना, तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' वर्जेश सोळंकी यांना जाहीर केला आहे. हा पुरस्कार वितरण दि. ४ रोजी स. ११.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात साहित्यिक राजन गवस यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. यावेळी आदित्य काळसेकर, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे हे प्रमुख उपस्थिती असतील, अशी माहिती मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्र सुट्टी दिवशी राहणार सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची



विविध अभ्यासक्रमांची द्वितीय व तृतीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे १ व २ ऑक्टोबर या सुट्टीच्या दिवशी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे मुख्य कार्यालय सुरू राहणार असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास) एम.कॉम., एम.एस्सी (गणित) अभ्यासक्रमांचे द्वितीय व तृतीय वर्षाचे प्रवेश आणि परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थी हितास्तव दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे मुख्य कार्यालय सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

लोकमत

# दूरशिक्षण केंद्र सुटी दिवशी राहणार सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची विविध अभ्यासक्रमांची द्वितीय आणि तृतीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे दि. १ व २ ऑक्टोबर या सुटीच्या दिवशीही दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे मुख्य कार्यालय सुरू राहणार असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील बी. ए., बी. कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास) एम. कॉम., एम. एस्सी (गणित) या अभ्यासक्रमांचे द्वितीय आणि तृतीय वर्षाचे प्रवेश तसेच परीक्षा फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू आहे.

लोकमत

# व्यावसायिक अभ्यासक्रम द्वितीय वर्ष प्रवेशास मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये अभियांत्रिकी, आर्किटेक्चर आणि औषधनिर्माणशास्त्र या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेशप्रक्रियेला मुदतवाढ मिळाली आहे. विद्यार्थ्यांना १२ ऑक्टोबरपर्यंत विनाविलंब अर्ज दाखल करण्यात येणार आहेत.

उशीर झाल्याने या अभ्यासक्रमांना काही विद्यार्थी परीक्षा अर्ज भरू शकलेले नाहीत. त्यामुळे या व्यावसायिक अभ्यासक्रमाना थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरण्यासाठी १२ ऑक्टोबरपर्यंत विनाविलंब, ५० रुपये विलंब शुल्कासह १४ ते १६ ऑक्टोबर आणि ३५० रुपये अतिविलंब शुल्कासह १८ व १९ ऑक्टोबरअखेर मुदतवाढ दिली आहे.

महाविद्यालयांनी अनुक्रमे १३, १७ आणि १९ ऑक्टोबरपर्यंत अर्ज देण्याची मुदत आहे, तर विद्यापीठात विनाविलंब १६ ऑक्टोबर आणि विलंब शुल्कासहित २० पर्यंत अर्ज भरण्यास मुदत असल्याचे पत्रक प्री-एक्झामचे उपकुलसचिव निवास माने यांनी दिली.

लोकमत

# आयबीपीएस प्रवेश परीक्षा आज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यापीठातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि पुण्याच्या बार्टी संस्थेमध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार सन २०२३-२४ कालावधीकरिता आय.बी.पी.एस. प्रवेश शिवाजी विद्यापीठातील परीक्षा मानव्यशास्त्र इमारतीमध्ये रविवार, दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० ते १२.३० कालावधीत पार पडणार आहे.

लोकमत

# विद्यापीठात मंगळवारी चिंचुरे यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एसयुके रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक व नवउद्योग सुरू करणाऱ्यांसाठी डॉ. अरविंद चिंचुरे यांचे दि. ३ ऑक्टोबर रोजी दुपारी ३:०० वाजता पदार्थविज्ञान अधिविभागाच्या सभागृहात व्याख्यान होणार आहे. डॉ. चिंचुरे यांनी देशपांडे स्टार्टअप, हुबळी या स्टार्टअपचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.

पुढारी

# विद्यापीठात आज 'आयबीपीएस' प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे रविवार, दि.१ रोजी सकाळी ११ ते १२.३० या कालावधीमध्ये आय.बी.पी.एस. परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ व बार्टी, पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला आहे.

आय.बी.पी.एस. प्रवेश परीक्षेसाठी शिवाजी विद्यापीठ केंद्रामार्फत ९३ विद्यार्थी बसले आहेत, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

पुण्यनगरी

# दूरशिक्षण केंद्र सुटीदिवशी सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची विविध अभ्यासक्रमांची द्वितीय व तृतीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे दि. १ व २ ऑक्टोबर या सर्टीच्या दिवशी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे मुख्य कार्यालय सुरू राहणार आहे. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.

सकाळ

# 'दूरशिक्षण'च्या प्रवेश प्रक्रिया आज, उद्या सुरू राहणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची विविध अभ्यासक्रमांची द्वितीय व तृतीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया रविवारी (ता. १) व सोमवारी (ता.२) सुरू राहणार आहे. सुटीच्या दिवशी केंद्राचे मुख्य कार्यालय सुरू राहील. २०२३-२४ मधील बी.ए., बी. कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम.एम.एस्सी (गणित) अभ्यासक्रमांचे द्वितीय व तृतीय वर्षाचे प्रवेश आणि परीक्षा फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. याची विद्यार्थी, पालक व अभ्यासकेंद्र समन्वयक यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.

तरुण भारत

# थेट व्दितीय वर्षाचा परीक्षा अर्ज भरण्यास गुरूवारपासून प्रारंभ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये अभियांत्रिकी, आर्किटेक्चर व औषधनिर्माणशास्त्र थेट व्दितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या आहे. अशा विद्यार्थ्यांना ऑक्टोबर-नोव्हेंबर-२०२३ हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्यासाठी विनाविलंब शुल्कासह ५ ते १२ ऑक्टोबरपर्यंत मुदत आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर केल्या आहेत. तरी विद्यार्थी व महाविद्यालयांनी याची दखल घेवून परीक्षा अर्ज वेळेत भरावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

अभियांत्रिकी, आर्किटेक्चर व औषधनिर्माणशास्त्र थेट व्दितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय व अधिविभागात

- **विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तारखा जाहीर**

विनाविलंब शुल्कासह ५ ते १२ ऑक्टोबरपर्यंत, विलंब शुल्कासह १४ ते १६ ऑक्टोबरपर्यंत आणि अतिविलंब शुल्कासह १८ ते १९ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्जाला ऑनलाईन अॅप्रुअल विनाविलंब शुल्कासह १३ ऑक्टोबर, विलंब शुल्कासह १७ ऑक्टोबर, अतिविलंब शुल्कासह १९ ऑक्टोबरपर्यंत द्यावयाचे आहे. महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क विनाविलंब शुल्कासह १६ ऑक्टोबर, विलंब आणि अतिविलंब शुल्कासह २० ऑक्टोबरपर्यंत विद्यापीठात भरावयाचे आहे. तरी याची दखल विद्यार्थी व महाविद्यालयांनी घ्यावी.

तरुण भारत

# दुरशिक्षण केंद्राची प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या बी.ए.,बी.कॉम.,एम ए., (मराठी,हिंदी,इंग्रजी,अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास),एम.कॉम.,एम.एस्सी (गणित), एम.बी.ए. या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची द्वितीय व तृतीय वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे भाग १, २ व ३ आणि रिपीटर विषयां चे ऑनलाईन अर्ज भरणेसाठी विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ संकेतस्थळावर www.unishivaji.ac.in भेट द्यावी. रिपीटर व फ्रेश अर्ज करण्याची मुदत बुधवार दि. ४ पर्यंत आहे. अधिक माहितीसाठी आपल्या अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा.

तरुण भारत

# एमबीए प्रवेशासाठी अखेरची संधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ 'एमबीए डिस्टन्स' अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांच्या प्रवेशासाठी शेवटची संधी उपलब्ध करून दिली आहे. प्रवेश घेण्याची अंतिम मुदत शनिवार दि. ३० रोजी असून विद्यापीठाची प्रवेश परीक्षा तथा इतर मान्यता प्राप्त संस्थांची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना डिस्टन्स एमबीए करिता प्रथम प्राधान्याने थेट प्रवेश घेता येणार आहे.